क्रमांक : का.स./बैठक/२०५

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : १७ मार्च, २००४.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १६ फेब्रुवारी, २००४ (सोमवार) रोजी झालेल्या २०५ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

१७.३.२००४

**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

शासनाचे मुख्य सचिव - **अध्यक्ष**
सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

श्री.द.म.सुकथनकर - **सदस्य**
"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,
मुंबई - ४०० ०१८.

श्री.र.य.तांबे - **सदस्य**
ए-६००, शिवम अपार्टमेंट्स,
सुरेंद्रनगर, आरपीटीएस रोड,
नागपूर - ४४० ०१५.

श्री.हरिशंकरन् - **सदस्य**
कार्यकारी संचालक इन्फ्रास्ट्रक्चर,
इन्फ्रास्ट्रक्चर लिजिंग अँड फिनान्सिअल सर्व्हिसेस लिमिटेड,
आय.एल. अँड एफ.एस्. फिनान्सिअल सेंटर, प्लॉट क्र.सी-२२,
'जी' ब्लॉक, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

शासनाचे प्रधान सचिव - **सदस्य**
नगर विकास विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

...२/-

महापालिका आयुक्त - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

शासनाचे प्रधान सचिव - सदस्य
गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक - सदस्य
सिडको, निर्मल, नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२३.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

निमंत्रित :

शासनाचे सचिव
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

शासनाचे प्रधान सचिव (उद्योग)
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

शासनाचे सचिव (पर्यावरण)
उर्जा व पर्यावरण विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेषित :-

विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि. प्राधिकरण.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

*********

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
# कार्यकारी समितीच्या २०५ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १६ फेब्रुवारी, २००४ (सोमवार) |
| वेळ | : | सकाळी १०.३० वाजता |
| सभास्थान | : | मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री.अजित निंबाळकर<br>शासनाचे मुख्य सचिव | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री.र.य.तांबे | - | सदस्य |
| डॉ.सुरेश जोशी<br>शासनाचे प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | - | सदस्य |
| श्री.विनय मोहन लाल<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको. | - | सदस्य |
| श्री.अरुण कुमार मागो<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री.विश्वास धुमाळ<br>
शासनाचे प्रधान सचिव (उद्योग),<br>
उद्योग, उर्जा व कामगार विभाग

श्री.सुब्रतो राठो<br>
अतिरिक्त महापालिका आयुक्त (पूर्व उपनगरे),<br>
बृहन्मुंबई महानगरपालिका

डॉ.टी. चंद्र शेखर
अतिरिक्त महानगर आयुक्त / प्रकल्प संचालक

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.वि.कृ.फाटक
प्रधान प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.सु.प्र.पेंढारकर
प्रमुख, नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.सुरेश परदेशी
मुख्य लेखा अधिकारी व वित्तीय सल्लागार,
सचिव, कार्यकारी समिती (अतिरिक्त कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.अ.वि.देशिंगकर
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मुर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

**बाब क्र.१ : दिनांक ३० ऑक्टोबर, २००३ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या मागील (२०४ व्या) बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : दिनांक ३० ऑक्टोबर, २००३ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या मागील (२०४ व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.

**<u>बाब क्र.३ : मुंबई मेट्रो रेल सेवेचा सर्वंकष आराखडा तयार करणे.</u>**

३.१ मुंबई मेट्रो रेल सेवेचा सर्वंकष आराखडा तयार करण्यासाठी दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन (DMRC) तर्फे हाती घेतलेल्या अभ्यासाचे सादरीकरण त्यांच्या प्रतिनिधीतर्फे सादर करण्यात आले. त्यामध्ये प्रकल्पाची प्रस्तावना, उद्दिष्टे, प्रवासी मागणी कार्यपध्दती, मुंबईतील उदयास येणारी प्रस्तावित नवीन विकास केंद्रे, प्रकल्पाबाबत वित्त व्यवस्था, प्रकल्पाचा अंदाजित खर्च, सर्वंकष आराखडा तयार करुन त्यातील विविध मार्गांचा प्राधान्यक्रम ठरविण्यासाठी वापरलेली कार्यपध्दती इत्यादी बाबींचा समावेश होता. मेट्रो रेल जाळयाची एकूण लांबी १४६.५ कि.मी. असून त्यापैकी ३२.५ कि.मी. भूयारी व ११४ कि.मी उंचावरुन जाणारा मार्ग आहे. हा प्रकल्प तीन टप्प्यात प्रस्तावित केला आहे. Master Plan करताना रेल आधारीत जलद परिवहन (Mass Transit) सेवा १ ते १.५ कि.मी. अंतरामध्ये बृहन्मुंबईतील बहुतांश भागातून उपलब्ध व्हावी ही बाब विचारात घेण्यात आली आहे.

३.२ श्री.सुकथनकर, सदस्य यांनी असे सुचविले की, मेट्रो रेलचे मार्ग अशारीतीने निश्चित करावे की ते नवीन विकास केंद्रांच्या वाढीस पूरक होतील तसेच त्यामुळे मुंबईतील वाहतूकीवरील ताण कमी होण्यास मदत होईल. व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी सुचविले की, मेट्रो रेल सेवा प्रस्तावित Special Economic Zone (SEZ) व नवीन विमानतळ, नवी मुंबई पर्यंत विस्तारीत करण्यात यावी. श्री.तांबे, सदस्य यांनी भूयारी मार्ग व उंचावरील मार्ग यांच्या खर्चाबद्दल विचारणा केली व असे सुचविले की, आंतरराष्ट्रीय अनुभव विचारात घेता शहराच्या दाट वस्तीत भूयारी मार्ग टाकणे संयुक्तिक होईल. प्रधान सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग यांनी अशी विचारणा केली की, लोकसंख्या व रोजगार अंदाज करताना कापडगिरण्या व बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाचा परिणाम विचारात घेणे आवश्यक आहे.

३.३ सादरीकरणाच्यावेळी DMRC च्या प्रतिनिधीने स्पष्ट केले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने क्षेत्रीय योजना तयार करताना विचारात घेतलेला जमीन वापर, लोकसंख्या व रोजगार अंदाजावर भविष्यकालीन फे-यांचे (Trips) अंदाज आधारित आहेत. कापड गिरण्यांच्या जमिनीच्या

पुनर्विकासामुळे लोकसंख्या व रोजगार वाढीवर होणारे परिणामसुध्दा विचारात घेण्यात आले आहेत. प्रकल्पाची अंदाजित किंमत ठरविताना दिल्ली येथील मेट्रो योजनेच्या अनुभवावरुन भूयारी मार्गाचा खर्च रु.२५० कोटी प्रति कि.मी. व उंचावरील मार्गाचा खर्च रु.१०० कोटी प्रति कि.मी. धरण्यात आला आहे. या प्रकल्पाचा एकूण अंदाजित खर्च सुमारे रु.१९,५२५/- कोटी इतका आहे. मेट्रो मार्गामुळे उपनगरीय रेल्वे व रस्त्यांच्या वाहतूकीवर होणा-या परिणामांचे विश्लेषण अंतिम अहवालात देण्यात येईल. या अभ्यासाची व्याप्ती बृहन्मुंबईमध्ये असून सर्वंकष मार्गाचे जाळे ठाणे, नवी मुंबई, मिरा-भाईंदर येथेपर्यंत नेण्यात येईल. त्यामध्ये मुंबई महानगर प्रदेशातील इतर भागांशी भविष्यकालीन संपर्काचा अंतर्भाव असेल. नवी मुंबईसाठी मानखूर्द व शिवडी (MTHL मार्गे) ठाणे रिंग रेल्वेसाठी मुलूंड व मिरा-भाईंदर येथे या बाहयभागातून येणा-या फे-या या अभ्यासात विचारात घेण्यात आल्या आहेत व त्यामध्ये SEZ मुळे होणारी वाढ लक्षात घेऊन अंतिम अहवाल करण्यात येईल. मे.मॅकेन्सी यांनी Vision Mumbai अहवालात सूचविलेल्या २ वर्तळाकार मार्गांचाही या अभ्यासात विचार केला आहे.

३.४ प्रस्तावित मेट्रो रेल सेवेमध्ये दोन रुळांमधील अंतर (Gauge) याबाबत महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या नगर विकास व गरिबी निर्मुलन मंत्रालयाने एका समितीची स्थापना केली आहे. नागरी क्षेत्रातील रेल्वे सेवेसाठी काय Gauge असावा व कोणते धोरण अवलंबवावे यासंबंधी ही समिती अभ्यास करेल. या समितीच्या शिफारशी मेट्रो प्रकल्पासाठी अवलंबण्यात येतील. प्राधान्य टप्पा-१ मध्ये सूचविलेल्या कुलाबा ते चारकोप या ३६ कि.मी. मार्गामध्ये कुलाबा ते महालक्ष्मी १० कि.मी. भाग भूयारी आहे ज्याचा खर्च रु.२५०० कोटी आहे व उर्वरीत २६ कि.मी. भागाचा खर्च रु.२६०० कोटी आहे. वर्सोवा ते अंधेरी प्रस्तावित मार्गाची लांबी १५ कि.मी. इतकी आहे. परंतु DMRC ला देण्यात आलेल्या सखोल प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याच्या अभ्यासामध्ये २५ कि.मी. पर्यंतच्या मार्गाचाच विचार करण्यात आलेला आहे. वांद्रे-कुर्ला संकुलाच्या विकासास चालना मिळावी व पश्चिम-पूर्व रेल्वे सेवा लवकर विकसित व्हावी या उद्देशाने कार्यकारी समितीने असे सूचविले की, टप्पा-१ मधील कुलाबा ते चारकोप व वर्सोवा ते अंधेरी या मार्गाबरोबरच टप्पा-२ मधील माहिम ते मानखुर्द या १२.८ कि.मी. मार्गाचाही टप्पा-१ मध्ये समावेश करावा. अशारीतीने टप्पा-१ मधील मार्गाची एकूण लांबी सुमारे ५४ कि.मी. होईल.

३.५ मा.अध्यक्षांनी असे सांगितले की, मा.मुख्यमंत्र्यांनी मेट्रो रेलच्या प्रकल्पाची घोषणा केली असल्यामुळे पहिल्या टप्प्यात DPR तातडीने करणे आवश्यक आहे. त्यामध्ये माहिम ते मानखुर्द या १२.८ कि.मी. मार्गाचाही समावेश करण्यात यावा. सदर बाबीमुळे DMRC च्या DPR तयार करण्याच्या फी मध्येही वाढ होईल ही बाब मा.अध्यक्षांच्या निदर्शनास आणण्यात आली.

३.६ त्यानंतर, कार्यकारी समितीच्या असेही निदर्शनास आणण्यात आले की, प्रकल्पाच्या अंमलबजावणी संबंधात DMRC ने पुढीलप्रमाणे कार्यपध्दती सुचविली आहे :-

(अ) या प्रकल्पासाठी एक स्पेशल पर्पज व्हेईकल (Special Purpose Vehicle) स्थापन करण्यात यावी व त्यासाठीच्या भागभांडवलामध्ये महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाचा सहभाग प्रत्येकी ५०% असा असावा.

(ब) दिल्ली मेट्रो रेल प्रकल्पाप्रमाणेच या प्रकल्पाचा ३०% ते ३५% खर्च केंद्र शासन / राज्य शासनाने समप्रमाणात करावा.

(क) प्रकल्प व्यवहार्य होण्यासाठी कर व शुल्क यामध्ये सवलती द्याव्यात.

(ड) प्रकल्पासाठी तसेच संबंधीत कामांसाठी शासकीय जमीन विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

कार्यकारी समितीने वरील प्रस्तावित कार्यपध्दतीस मान्यता दिली व प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी या कार्यपध्दतीची शिफारस केली. तसेच कार्यकारी समितीने असाही निर्णय घेतला की, प्रकल्पाचा सर्वंकष आराखडा (Master Plan) प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर करावा. तसेच टप्पा-१ मधील प्रस्तावित मार्गाबरोबरच टप्पा-२ मधील माहिम ते मानखूर्द पर्यंतच्या मार्गाचा सखोल प्रकल्प अहवाल (DPR) करण्यात यावा.

३.७ त्यानंतर, कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.८९२</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई मेट्रो रेल प्रकल्पाच्या अंमलबजावणी

संबंधात DMRC ने सुचविलेल्या खालील कार्यपध्दतीस कार्यकारी समिती तत्वतः मान्यता देत आहे व प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी या कार्यपध्दतीची शिफारस करीत आहे :-

(अ) या प्रकल्पासाठी एक स्पेशल पर्पज व्हेईकल (Special Purpose Vehicle) स्थापन करण्यात यावी व त्यासाठीच्या भागभांडवलामध्ये महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाचा सहभाग प्रत्येकी ५०% असा असावा.

(ब) दिल्ली मेट्रो रेल प्रकल्पाप्रमाणेच या प्रकल्पाचा ३०% ते ३५% खर्च केंद्र शासन / राज्य शासनाने समप्रमाणात करावा.

(क) प्रकल्प व्यवहार्य होण्यासाठी कर व शुल्क यामध्ये सवलती द्याव्यात.

(ड) प्रकल्पासाठी तसेच संबंधीत कामांसाठी शासकीय जमीन विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई मेट्रो रेल प्रकल्पाच्या टप्पा-१ मधील प्रस्तावित मार्गाबरोबरच टप्पा-२ मधील माहिम ते मानखूर्द या १२.८ कि.मी. मार्गाचाही समावेश करण्यात यावा. सदर मार्गाचा सखोल प्रकल्प अहवाल (DPR) DMRC कडून करण्यात यावा."

## बाब क्र.४ : अंधेरी-घाटकोपर मार्गावर सार्वजनिक जलद प्रवास यंत्रणेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रस्ताव

४.१ प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी यापूर्वी जर्मन सल्लागारांद्वारा केलेला सुसाध्यता अभ्यास अद्ययावत करण्यासंबंधी थोडक्यात माहिती दिली. त्यानंतर मे.कन्सलटींग इंजिनिअरिंग सर्व्हीसेस (मे.सी.इ.एस.) या सल्लागारांनी अभ्यासकार्याचे निष्कर्ष व शिफारशी यासंबंधी सादरीकरण केले. या सार्वजनिक जलद प्रवास यंत्रणेची परिमाणे व संबंधीत संरचना ही मुंबई मेट्रो रेल्वे कॉरिडॉर नेटवर्कसाठी दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनने केलेल्या अभ्यासाशी सुसंगत अशी आहे व त्यामुळे सार्वजनिक जलद प्रवास यंत्रणा आणि प्रस्तावित मुंबई मेट्रो रेल्वे यंत्रणा यांचे पुढील काळात एकात्मीकरण (Integration) करणे शक्य होईल.

४.२ कार डेपोसाठी वर्सोवा व गोदरेज येथील जागेचा विचार करावा लागणार आहे. अंधेरी-घाटकोपर मार्गावरील सार्वजनिक प्रवास यंत्रणेचा हा प्रकल्प खाजगी क्षेत्राच्या सहभागाने हाती

घ्यावयाचा प्रस्ताव आहे. प्रकल्पामध्ये राज्य शासनाचा सहभाग असल्यास गुंतवणूकदारांमध्ये विश्वास निर्माण होईल. सल्लागारांनी सादरीकरणाच्या वेळीही सदर बाबीवर भर दिला. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून या प्रकल्पासाठी पुढील ५ वर्षात अंदाजे एकूण रु.३५६ कोटीची गुंतवणूक करावी लागेल. प्रकल्प संचालक (मुंबई नागरी परिवहन प्रकल्प) यांनी सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या भागभांडवलातील २६% हिस्स्यापैकी १३% हिस्सा केंद्र शासनाकडून, दिल्ली मेट्रो रेल प्रकल्पाच्या धर्तीवर अपेक्षित असून यासंबंधीचा सविस्तर प्रस्ताव केंद्र शासनाकडे यापूर्वीच पाठविण्यात आला आहे.

४.३ या प्रस्तावावर सविस्तर चर्चेनंतर, कार्यकारी समितीने ठरविले की, या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे. यासंबंधात कार्यकारी समितीने खालील बाबींना तत्वतः मान्यता देवून प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी शिफारस केली :-

१. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी स्थापन करावयाच्या स्पेशल पर्पज व्हेईकल (Special Purpose Vehicle) मधील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे भागभांडवल २६% पेक्षा जास्त नसावे. केंद्र शासनाच्या १३% सहभागासाठी प्राधिकरणाने प्रयत्न करावेत.

२. निविदा तयार करणे, खाजगी क्षेत्रातील संस्था निवडणे (Selection of concessionaire) व प्रकल्पाच्या प्रारंभाच्या कामांपासून प्रकल्पाच्या अंमलबजावणी पर्यंतच्या सर्व कामांसाठी मालकाच्या सल्लागाराची (owner's consultant) नेमणूक करण्यासाठी जागतिक स्तरावर निविदा मागविणे

३. प्रकल्प अंमलबजावणी पथक मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामध्ये स्थापन करण्यात यावे.

४. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या ऐवजी महानगर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली इतर सदस्यांचा समावेश असलेली एक सुकाणू समिती स्थापन करण्यात यावी. या समितीमध्ये उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांचा समावेश असेल.

५. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी जागतिक स्तरावर तांत्रिक व वित्तीय निविदा मागविण्यासाठी पुढील कार्यवाही करणे.

**बाब क्र.५ : भारत : मुं.ना.प.प्र.- सीआर-३६६२ आयएन/ एलएन-४६६५आयएन मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत मौजे गोरेगांव, गाव नेस्को, पश्चिम द्रुतगती महामार्ग, गोरेगांव (पूर्व), मुंबई (A3) येथे प्रकल्पग्रस्तांसाठी कायमस्वरुपी सदनिकांचे बांधकाम करणे.**

५.१ या बाब टिप्पणीचा तपशील विशद करताना मुख्य अभियंता यांनी असे सादर केले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पामुळे बाधित होणा-या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी गोरेगांव नेस्को येथे २३० पक्क्या सदनिका २४ दुकानांचे गाळे आणि बालवाडया, संस्थेची कार्यालये, सांस्कृतिक केंद्रे (एकूण ३४) बांधावयाच्या आहेत. या बांधकामासाठी सार्वजनिकरित्या निविदा दिनांक ३.९.२००३ व दिनांक ४.९.२००३ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मागविण्यात आल्या होत्या व प्राप्त झालेल्या निविदांपैकी मेसर्स ईगल कन्स्ट्रक्शन् यांची निविदा रु.६,७६,१३,३३७/- ही सर्वात लघुत्तम आहे. त्याप्रमाणे जागतिक बँकेस निविदा मुल्यांकन अहवाल सादर करण्यात आला व त्यास जागतिक बँकेने दिनांक २.१२.२००३ रोजीच्या पत्राने मंजूरी दिली आहे. पुढे असेही सादर करण्यात आले की, निविदेतील प्राप्त झालेले दर हे निविदेतील अंदाजित किंमतीच्या तुलनेने कमी आहेत. सदर प्रस्तावास मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांची मान्यता घेऊन निविदाकारास निविदा स्विकारल्याचे पत्र देण्यात आले आहे. सदर प्रस्ताव कार्यकारी समितीच्या कार्योत्तर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

५.२ सदर प्रस्तावावर चर्चा केल्यानंतर कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला:-

**ठराव क्र. ८९३ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोटकलम (३)(iii) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत बाधित होणा-या प्रकल्पग्रस्तांसाठी मौजे गोरेगांव, नेस्को पश्चिम द्रुतगती महामार्ग, गोरेगांव मुंबई येथे करण्यात येणा-या पक्क्या सदनिकांच्या बांधकामाची, निविदाकार मे.ईगल कन्स्ट्रक्शन कं. यांची

रु.६,७६,१३,३३७/- इतक्या सर्वात कमी किंमतीची निविदा स्विकारण्यास, करारनाम्यातील अटींप्रमाणेच देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सभेच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय निविदेनुसार आवश्यक असणा-या कागदपत्रांची पूर्तता करणे आणि जागतिक बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करणे आदीसाठी महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.६ : भारत : मुं.ना.प.प्र.- सीआर-३६६२ आयएन/ एलएन-४६६५आयएन मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत मौजे गोरेगांव, गाव निरलॉन, पश्चिम द्रुतगती महामार्ग, गोरेगांव (पूर्व), मुंबई (A3) येथे प्रकल्पग्रस्तांसाठी कायमस्वरुपी सदनिकांचे बांधकाम करणे.**

६.१ या बाब टिप्पणीचा तपशील सादर करताना मुख्य अभियंता यांनी असे सादर केले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या बाधित कुटुंबांसाठी गोरेगांव निरलॉन येथे २४६ पक्क्या निवासी सदनिका बांधवयाच्या असून २४ दुकानांचे गाळे, बालवाडया, संस्थेची कार्यालये, सांस्कृतिक केंद्रे (एकूण ३४) व अनुषंगिक पायाभूत सुविधांचा समावेश असून राज्य शासनाच्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या धोरणानुसार बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. सदर कामासाठी निविदा सूचना ३ व ४ सप्टेंबर, २००३ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती व त्यास अनुसरुन एकूण सात निविदा प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त झालेल्या निविदांपैकी मेसर्स ईगल कन्स्ट्रक्शन् कंपनी यांची निविदा सर्वात लघुत्तम होती.

६.२ मुख्य अभियंता यांनी पुढे असे सांगितले की, जागतिक बँकेच्या निकषानुसार एका निविदा सुचनेद्वारे मागविण्यात आलेल्या निविदांमध्ये जर एखादा निविदाकार एकापेक्षा जास्त कामामध्ये लघुत्तम असल्यास एकापेक्षा जास्त कामे देण्याबाबतची निविदाकाराची क्षमता तपासताना निकषातील परिमाणांची एकत्रित बेरीज करुन ठरवावयाची आहे. या अटीची मे.ईगल कन्स्ट्रक्शन कंपनी हे पूर्तता करीत नसल्यामुळे त्यांची निविदा लघुत्तम असूनही त्यांना सदर काम देता येत नाही. त्यामुळे त्यांच्या खालोखाल लघुत्तम असलेली रु.६,९३,३५,०००/- ची मे.क्लासिक कन्स्ट्रक्शन कंपनीची निविदा मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे. मुख्य अभियंता यांनी पुढे असेही सांगितले की,

निविदेची शिफारस करणारा निविदा मुल्यांकन अहवाल जागतिक बँकेला सादर करण्यात आला होता. त्यास जागतिक बँकेने दिनांक २ डिसेंबर, २००३ रोजी मान्यता दिली आहे. त्यामुळे अध्यक्ष, कार्यकारी समिती यांच्या मान्यतेने निविदाकारास निविदा स्विकारण्याचे पत्र देण्यात आले आहे.

**६.३** प्रधान सचिव (उद्योग) उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांनी प्रति चौरस फूट बांधकामाच्या दराची चौकशी केली असता, मुख्य अभियंता यांनी प्रती चौरस मीटर बांधकामाचा दर रु.७४१/- इतका असल्याचे सांगितले. त्यानंतर पुन्हा प्रधान सचिव यांनी बांधकामाचा चौ. फूटाचा दर फारच जास्त आहे, तसेच त्यामध्ये जागेच्या किंमतीचाही समावेश नाही असे सांगितले. याबाबत स्पष्टीकरण देताना मुख्य अभियंता यांनी सांगितले की, ही इमारत तळमजला + ५ मजल्यांची आहे. त्यामध्ये दुकानांचा समावेश आहे तसेच जागतिक बँकेच्या नियमानुसार सोयी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर निविदांमधील दर १.३०% ने अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा कमी आहे. अध्यक्ष, कार्यकारी समिती यांच्या मान्यतेने निविदाकारास निविदा स्विकारण्याचे पत्र देण्यात आले आहे व काम सुरु झाले आहे.

**६.४** सदर बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर कार्यकारी समितीने प्रस्तावास कार्योत्तर मंजूरी दिली व पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र. ८९४</u>** :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोटकलम (३)(iii) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत बाधित होणा-या प्रकल्पग्रस्तांसाठी मौजे गोरेगांव, निरलॉन पश्चिम द्रुतगती महामार्ग, गोरेगांव मुंबई येथे करण्यात येणा-या पक्क्या सदनिकांच्या बांधकामाची, निविदाकार मे.क्लासिक कन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांची रु.६,९३,३५,०००/- इतक्या दुस-या सर्वात कमी किंमतीची निविदा स्विकारण्यास, करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, सभेच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय निविदेनुसार आवश्यक असणा-या कागदपत्रांची पूर्तता करणे आणि जागतिक बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करणे आदींसाठी महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ : भारत : मुं.ना.प.प्र.- सीआर-३६६२-आयएन/ एलएन-४६६५ आयएन मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता व पश्चिम द्रुतगती महामार्ग यांच्या जंक्शनजवळ मौजे मजास येथे भूखंड क्र.५०(भाग), ५१(भाग) व ५२(भाग) येथे प्रकल्पग्रस्तांकरीता करण्यात येणारे कायमस्वरुपी गाळयांचे बांधकाम (पर्याय-अ)**

७.१ मुख्य अभियंता यांनी बाब टिप्पणीची माहिती देताना असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता व पश्चिम द्रुतगती महामार्ग यांच्या जंक्शनजवळ मौजे मजास येथे प्रकल्पग्रस्तांकरीता १०९० निवासी गाळे, १४३ दुकाने व ३३ सुविधा गाळे यांसाठी १२ इमारती बांधण्यात येणार आहेत. सदर कामांकरीता दिनांक ३ व ४ सप्टेंबर, २००३ रोजीच्या वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. त्यास अनुसरुन ११ ठेकेदारांनी निविदा दस्तऐवज खरेदी केले. त्यापैकी ३ निविदाकारांनी निविदा सादर केल्या आहेत. सदर कामाकरीता मे.पटेल इंजिनिअरींग लिमिटेड यांनी रु.४०,३४,००,०००/- दराची लघुत्तम निविदा सादर केली आहे. सदर निविदेचे मुल्यांकन करण्यात आले असून जागतिक बँकेने दिनांक २९.१.२००४ रोजी निविदाकारास मंजूरी दिली आहे.

७.२ जागतिक बँकेने सदर निविदांस मंजूरी दिली असल्याने कार्यकारी समितीकडे बाब टिप्पणी मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे. कार्यकारी समितीस विनंती करण्यात येते की, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मंजूरी द्यावी.

७.३ सदर बाब टिप्पणीवर विचारविमर्श झाल्यानंतर कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. ८९५ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोटकलम (३)(iii) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता व पश्चिम द्रुतगती महामार्ग यांच्या जंक्शनजवळ मौजे मजास येथे भूखंड क्र.५०(भाग), ५१(भाग) व ५२(भाग) येथे प्रकल्पग्रस्तांकरीता करण्यात येणारे कायमस्वरुपी गाळयांचे बांधकामासाठी (पर्याय-अ) मेसर्स पटेल इंजिनिअरिंग लि. यांची रु.४०,३४,००,०००/- इतक्या किंमतीची न्युनतम सुसंवादी निविदा (Lowest evaluated responsive bid) स्विकारण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** जागतिक बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार सदर ठरावाबाबत योग्य ती कार्यवाही करण्याकरीता याद्वारे प्रकल्प संचालक, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**वाव क्र.८ : मुंबई नागरी सुविधा प्रकल्पाची अंमलवजावणी खालील नमूद कामासाठी प्रकल्प संकल्पना तपासणी सल्लागारांची नियुक्ती करणेबाबत :**

**१) पूल, उड्डाणपूल इत्यादीच्या संकल्पनाची तांत्रिक तपासणीसाठी.**

**२) पुनर्वसनासाठी पक्की घरे बांधण्याच्या कामाच्या संकल्पनांची तांत्रिक तपासणी व बांधकामाची देखरेख.**

८.१ मुख्य अभियंता यांनी या वाव टिप्पणीची पार्श्वभूमी विशद करताना असे सादर केले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत ज्या उड्डाणपूलांची बांधकामे करावयाची आहेत त्यांची प्रकल्प सल्लागारांनी बनविलेली संकल्पचित्र तपासणी (Proof Checking) तसेच मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गतच्या कामामुळे बाधित होणा-या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी बांधावयाच्या पक्क्या सदनिकांची संकल्पचित्रे तपासणे तसेच आवश्यकतेनुसार बांधकामाचे पर्यवेक्षण करणे आदींसाठी सल्लागारांची नियुक्ती करण्यासाठी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देवून सार्वजनिकरीत्या तांत्रिक व आर्थिक प्रस्ताव मागविण्यात आले. प्राप्त प्रस्तावांचे निविदेतील तरतुदीनुसार समितीमार्फत मुल्यांकन करण्यात आले. तसेच सर्व सल्लागारांचे देय होणा-या फी मध्ये तफावत राहू नये म्हणून फी चे प्रमाण नक्की करण्यात आले. मात्र ज्या सल्लागारांनी

प्रमाणित फी पेक्षा कमी फी ची मागणी केली आहे अशा सल्लागारांची फी त्यांनी केलेल्या मागणी इतकीच मर्यादित ठेवण्यात आली. त्याप्रमाणे प्रपत्र-१ मध्ये दर्शविलेल्या २० तसेच प्रपत्र-२ मध्ये दर्शविलेल्या १० सल्लागारांची मंजूर यादी करण्याचा प्रस्ताव आहे. पुनर्वसन व पुनर्वसाहत या कामांसाठी प्राधिकरणाकडे स्वतःचे वाहन असल्याकारणाने सल्लागारांकडून वाहने घेण्याची तरतुदीची आवश्यकता वाटत नाही. म्हणून सल्लागारांच्या फी मधून वाहनापोटी कमीतकमी रु.१५,०००/- किंवा त्यांनी देऊ केलेल्या जास्त रक्कमेच्या वटावदराप्रमाणे रक्कम दरमहा वजा करण्यात यावी.

८.२ श्री.तांबे, सदस्य यांनी प्रमाणित (Standard) फी ठेवण्यात आल्याबाबत विचारणा केली असता, मुख्य अभियंता यांनी असे सांगितले की, काही सल्लागारांनी देकारामध्ये जास्त फी नमूद केली आहे. सल्लागारांच्या फी मध्ये एकसूत्रता आणण्यासाठी फी प्रमाणित करण्यात आली आहे.

८.३ मा. अध्यक्ष यांनी कामे लवकर व वेळेत होण्यासाठी, कामावर देखरेख ठेवण्यासाठी तसेच कामांची तपासणी करुन गुणवत्ता उत्तम राखणेसाठी सल्लागारांची नेमणूक करणे आवश्यक आहे असे निर्देश दिले. तसेच सदर पध्दत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडेही अस्तित्वात असून त्यामुळे प्रशासकीय खर्चातही बचत होते असे सांगितले.

८.४ चर्चेच्या दरम्यान कामाचे वाटप करतेवेळी ज्या सल्लागारांची फी ही प्रमाणित फी पेक्षा कमी आहे त्या सल्लागारांना त्यांच्या क्षमतेएवढे काम देण्यात यावे अशा मा.अध्यक्षांनी सुचना दिल्या.

८.५ वरील चर्चेस अनुसरुन कार्यकारी समितीने तयार करण्यात आलेल्या सल्लागारांच्या सुचीस मान्यता दिली व पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ८९६</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोटकलम (३)(iii) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत (१) पूल, उड्डाणपूल यांच्या संकल्पना तपासणीच्या कामासाठी (२) पुनर्वसन व पुनर्वसाहत यासाठी

बांधावयाच्या इमारतीच्या संकल्पना तपासणी आणि बांधकामावर देखरेख यासाठी यासोबत जोडलेल्या जोडपत्रे १ व २ मध्ये नमूद सल्लागारांची प्रविष्ट निवड सूची करण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोटकलम (३)(iii) व पोटकलम (५) नुसार, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत जोडपत्रे १ व २ मध्ये नमूद केलेल्या सल्लागारांना कामे आवंटीत करण्यासाठी व त्यावर होणा-या खर्चाला मान्यता देण्यासाठी कार्यकारी समिती याद्वारे महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे. काम क्र.२ साठी प्राधिकरणाकडे स्वतःचे वाहन असल्याकारणाने हया तरतूदीची आवश्यकता वाटत नाही, म्हणून सल्लागारांच्या फी मधून वाहनापोटी कमीतकमी रु.१५,०००/- किंवा त्यांनी देऊ केलेल्या जास्त रक्कमेच्या वटावदराप्रमाणे रक्कम दरमहा वजा करण्यात यावी.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पासाठीच्या कामासाठी आवश्यक असणा-या सल्लागारांची नेमणूक करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना याद्वारे प्रदान करण्यात येत आहेत."

**बाब क्र.९(अ) : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ३० सप्टेंबर, २००३ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

**बाब क्र.९(ब) : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ३१ डिसेंबर, २००३ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

प्राधिकरणाचे मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० सप्टेंबर व दिनांक ३१ डिसेंबर, २००३ रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाच्या दोन्ही त्रैमासिक लेख्यांची कार्यकारी समितीने नोंद घेतली.

**बाब क्र.१० : प्राधिकरणाकडील अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक १ ऑक्टोबर, २००३ ते दिनांक ३१ डिसेंबर, २००३ पर्यंत.**

प्राधिकरणाकडील दिनांक १ ऑक्टोबर, २००३ ते दिनांक ३१ डिसेंबर, २००३ पर्यंतच्या असलेल्या अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.११ : मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी तिमाही व्यवस्थापन अहवाल दिनांक ०१.०४.२००३ ते दिनांक ३०.०६.२००३**

मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधीच्या दिनांक १ एप्रिल, २००३ ते दिनांक ३० जून, २००३ रोजीच्या तिमाही अहवालाची कार्यकारी समितीने नोंद घेतली.

**बाब क्र.१२ : स्थानिक संस्थांनी मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी अंतर्गत कर्जाच्या प्रतिभुतीसाठी एस्क्रो खात्यात ठेवावयाच्या रकमेत कमी करणे.**

१२.१ प्रस्तावाबाबत माहिती देतांना प्रमुख, नियोजन विभाग यांनी सांगितले की, प्राधिकरण, मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी अंतर्गत महानगर प्राधिकरण महानगरपालिकांना व नगर परिषदांना कर्ज देत असते. कर्जाची नियमितपणे परतफेड व्हावी म्हणून या संस्थांना बँकेत एस्क्रो खाते किंवा कर्ज परतावा निधी खाते उघडण्यासाठी सांगण्यात येते. या बँकेच्या खात्यामध्ये संबंधित संस्थांनी ठराविक दरमहा रक्कम भरावी लागते. अशी दरमहा भरलेली रक्कम ३ वर्षाच्या परतफेडीच्या रक्कमेएवढी जमा झाली की पुढे रक्कम भरावी लागत नाही. ही रक्कम कर्जाच्या प्रतिभूती स्वरुपात संस्थांच्या एस्क्रो खात्यामध्ये जमा असते. अशा रक्कमेचा वापर करता येत नसल्यामुळे पनवेल, उल्हासनगर व कुळगांव-बदलापूर या स्थानिक संस्थांनी भरावी लागणारी रक्कम कमी करावी किंवा जमा झालेल्या रक्कमेचा वापर त्यांना करु द्यावा अशी निवेदने केली आहेत. त्यामुळे भरावयाची रक्कम ही अधिकतम ३ वर्षाऐवजी १८ महिन्यांच्या परतफेडीच्या रक्कमेएवढी असावी असा प्रस्ताव आहे.

१२.२ महानगर आयुक्तांनी वरील बाबीवर अधिक माहिती देताना सांगितले की, एस्क्रो खात्यामध्ये भरावयाची रक्कम कमी करण्यासंबंधी २ पर्याय विचारार्थ सादर करण्यात आले आहेत. पर्याय-१ नुसार स्थानिक संस्थेने आपल्या मुख्य खात्यातून दरमहा ठराविक रक्कम एस्क्रो खात्यात परतफेडीचे तीन (सहामाही) हप्ते जमा होईपर्यंत जमा करावी म्हणजे त्यातून कर्जाचा एक हप्ता दिल्यानंतर २ हप्ते कायमस्वरुपी प्रतिभूती (Security) म्हणून जमा राहतील. पर्याय-२ नुसार जर या संस्थांना सर्व प्रकारच्या महसूलीपासून जमा होणारे उत्पन्न प्रथम एस्क्रो खात्यात जमा केले तर प्रतिभूती म्हणून तर केवळ एक (सहामाही) हप्ता जमा ठेवणे आवश्यक राहील.

१२.३ महानगर आयुक्तांनी पुढे असेही सांगितले की, वरील संस्थेपैकी काही संस्थांनी पर्याय-१ व काहींनी पर्याय-२ ला पसंती दर्शविल्यामुळे दोन्हीपैकी कोणताही पर्याय स्विकारण्याबाबत संस्थांना मोकळीक असावी असे प्रस्तावित केले आहे.

१२.४ चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला:-

ठराव क्र. ८९७ :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २१(अ) अंतर्गत प्राप्त अधिकार व प्राधिकरणाच्या ठराव क्र.४२२, दिनांक ३१ मार्च, १९९० द्वारे प्राधिकरणाने प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे पुढील प्रस्तावांना मंजूरी देत आहे :-

मिरा-भाईंदर, उल्हासनगर, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका व पनवेल, कुळगांव-बदलापूर, अंबरनाथ, उरण, नालासोपारा, नवघर-माणिकपूर व विरार नगरपरिषदांना प्राधिकरणाने खाली नमूद केलेले दोन पर्याय कळविण्यात यावेत.

पर्याय-१ : स्थानिक संस्थेने आपल्या खात्यातून दरमहा ठराविक रक्कम एस्क्रो / कर्ज परतावा निधी खात्यामध्ये जमा करावी. अशी रक्कम एस्क्रो खात्यातील व्याजासह, कर्ज परतफेडीचे तीन (सहामाही) हप्ते जमा होईपर्यंत जमा करावी, म्हणजे त्यातून कर्जाचा एक हफ्ता दिल्यानंतर दोन हप्ते कायमस्वरुपी एस्क्रो / कर्ज परतावा निधी खात्यात प्रतिभूति (Security) म्हणून जमा राहतील. कर्जाचा एक हफ्ता परत फेडल्यानंतर तेवढीच रक्कम या खात्यात या संस्थांनी पुढच्या सहा महिन्याच्या आत जमा करावी.

पर्याय-२ : या संस्थांनी सर्व प्रकारच्या महसुलापासून जमा होणारे उत्पन्न प्रथम एस्क्रो / कर्ज परतावा निधी खात्यात जमा करावे व या खात्यात कर्ज परतफेडीचा एक हप्ता प्रतिभूती (Security) म्हणून जमा ठेवावा व उर्वरीत रक्कम त्याच बँकेत संस्थेच्या दुस-या खात्यात इतर खर्चासाठी जमा करण्यात यावी.

वर उल्लेख केलेल्या महानगरपालिका व नगरपरिषदांनी वरील पर्यायांपैकी त्यांना योग्य वाटेल असा पर्याय निवडावा व त्याप्रमाणे सुधारीत अट यापूर्वी केलेल्या कर्ज करारात समाविष्ट करावी.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की**, ठरावाची अंमलबजावणी करण्यास व सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.१३</u> : <u>मुंबई नागरी परिवहन प्रकल्प - सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याच्या मजबूतीकरणाच्या (भाग-II) कंत्राटास मान्यता देणेबाबत.</u>**

१३.१ मुख्य अभियंता यांनी बाब टिप्पणीची माहिती देताना असे सांगितले की, सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याच्या भाग-II मध्ये सुमारे १.४४ कि.मी. लांबीचा जोडरस्ता व कुर्ला नेहरुनगरकडे जाणा-या मार्गाच्या बांधकामासाठी सार्वजनिक निविदा वर्तमानपत्रातून मागविण्यात आल्या होत्या. सदर कामाकरीता एकूण ९ सीलबंद निविदा प्राप्त झाल्या होत्या. मुख्य अभियंता यांनी पुढे असे सांगितले की, प्राप्त झालेल्या निविदांची छाननी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व प्राधिकरणातील अधिका-यांची समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने प्राप्त ९ निविदांपैकी ३ निविदांना लघुत्तम १, २ व ३ असे क्रमांक दिलेले आहेत. मुख्य अभियंता यांनी पुढे असे सादर केले की, मे. सिटीक बिको (CITIC BIECO) या चीनी कंपनीची निविदा जरी लघुत्तम असली तरी त्यांनी असंतुलीत दरापोटी द्यावयाच्या अतिरिक्त सुरक्षित अनामत रक्कमेसाठी बँकेची हमी देण्यास नकार दिला आहे. त्यामुळे त्यांची निविदा विसंवादी झाली आहे. त्यानंतर लघुत्तम असलेल्या मे.गॅमन इंडिया प्रा.लि. यांची रु.७९,९०,६०,५४२/- च्या निविदेची मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली आहे.

१३.२ सदर निविदेचा सविस्तर मुल्यांकन अहवाल जागतिक बँकेस सादर करण्यात आला होता व जागतिक बँकेने दिनांक २७.१.२००४ च्या पत्राने सदर काम मे.गॅमन इंडिया प्रा.लि. यांना देण्यास सहमती दर्शविली आहे. त्यामुळे कार्यकारी समितीस विनंती करण्यात येते की, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मंजूर करावा.

१३.३ सदर बाबीवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र. ८९८</u> :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की**, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोटकलम (३)(iii) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या

इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती, या ठरावाद्वारे मेसर्स गॅमन इंडिया प्रा.लि. यांच्या रु.७९,९०,६०,५४२/- (रुपये एकोणऐंशी कोटी नव्वद लक्ष साठ हजार पाचशे बेचाळीस फक्त) एवढया रक्कमेच्या सर्वात लघुत्तम सुसंवादी देकारास मंजूरी देत आहे.

**“असाही ठराव करण्यात येत आहे की,** कार्यकारी समिती याद्वारे कामाचा ठेका देणे व त्याची यशस्वी पूर्तता करणे यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**बाब क्र.१४ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्प / मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्तांसाठी बांधण्यात येणा-या कायमस्वरुपी निवासी गाळयांसाठी मलनिःस्सारण (मुंबई- १ व २), जलवाहिन्या टाकणे (मुंबई-१ व २), रस्ते बांधणे (मुंबई-१ व २) व पुल बांधणे इत्यादी कामांच्या लघुत्तम निविदांना मंजूरी मिळणेबाबत.**

१४.१ मुख्य अभियंता यांनी बाब टिप्पणीची संक्षिप्त माहिती दिली. त्यांनी पुढे सांगितले की. मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या अंमलबजावणीमुळे विस्थापित होणा-या कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी पक्क्या सदनिकांची बांधकामे प्रगतीपथावर आहेत. त्या ठिकाणी बाहय पायाभूत सुविधा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्यावतीने प्राधिकरणामार्फत कामे करण्यात येणार आहेत. सदर कामाकरीता प्राधिकरणामार्फत सार्वजनिकरीत्या दिनांक २२ नोव्हेंबर, २००३ रोजी वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन ७ कामांसाठी एकत्रित निविदा मागविण्यात आल्या होत्या. मुख्य अभियंता यांनी पुढे असे सांगितले की, कामे अल्पावधीत पूर्ण करावयाची असल्यामुळे निविदेत एका निविदाकारास एकच काम दिले जाईल. अशी अट अंतर्भूत करण्यात आली होती. सदर कामासाठी कराव्या लागणा-या खर्चाची रक्कम रु.२०.९५ कोटी (अंदाजित) ही विकासकांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे अदा केलेली ही रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे प्राधिकरणास मिळणार आहे. तसेच निविदेतील सूचनेप्रमाणे पात्रता व अटी समाधानकारकरीत्या पूर्ण न केलेल्या निविदा विसंवादी (non responsive) आढळल्यामुळे त्या वगळण्यात आल्या आहेत. प्राप्त झालेल्या निविदा स्पर्धात्मक असून दरही वाजवी आहेत.

१४.२ महानगर आयुक्त यांनी ७ कामांपैकी ५ निविदा हया अंदाजित किंमतीस किंवा त्यापेक्षा कमी किंमतीस प्राप्त झाल्याचे सांगितले. मुख्य अभियंता यांनी जलवाहिन्या टाकणे (अनु.क्र.३)

या कामासाठी मे.एस.बी.खाकल यांची निविदा अंदाजित किंमतीपेक्षा ६.५७% इतक्या कमी दराची होती असे सांगितले. तथापि, जलवाहिन्या टाकणे (मुंबई-१, अनु.क्र.४) वरील काम मे.एस.बी.खाकल यांना द्यावयाचे असल्यामुळे काम क्र.३ साठी सादर केलेल्या निविदेचा विचार करण्यात आलेला नाही. मात्र त्याऐवजी मे.के.ए.पाटील द्वितीय लघुत्तम कामाचे निविदाकार यांच्याशी वाटाघाटीने दर कमी करुन ६.५७% पर्यंत कमी करण्यात आले आहेत. त्यामुळे अनु.क्र.३ चे काम मे.के.ए.पाटील यांना देण्याचा प्रस्ताव बाब टिप्पणीमध्ये सादर केलेला आहे. प्राधिकरणावर यामुळे कोणताही अतिरिक्त आर्थिक भार पडणार नाही.

**१४.३** सदर बाब टिप्पणीवर विचारविमर्श झाल्यानंतर कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला:-

**ठराव क्र. ८९९ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोटकलम (३)(iii) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांसाठी खालील लघुत्तम निविदा स्विकारण्यास करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह मंजूरी देण्यात येत आहे :-

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदाकाराचे नांव | टक्केवारी | **लघुत्तम देकार रक्कम (रु.)** |
|---|---|---|---|---|
| १. | मलनिःस्सारण, मुंबई-१ | मे.राजेश कन्स्ट्रक्शन कंपनी | अंदाजपत्रकाच्या दराने | ३,५९,२३,६२२/- |
| २. | मलनिःस्सारण, मुंबई-२ | मे.माय असोसिएट्स | ३.२९% कमी दराने | ३,५३,८१,८३०/- |
| ३. | जलवाहिन्या टाकणे, मुंबई-१ | मे.के.ए.पाटील | ६.५७% कमी दराने | २,५६,९३,२५०/- |
| ४. | जलवाहिन्या टाकणे, मुंबई-२ | मे.एस.बी.खाकल | २.७०% जास्त दराने | २,८२,४२,५००/- |
| ५. | रस्ते बांधणे, मुंबई-१ | मे.रिलायन्स कन्स्ट्रक्शन कंपनी | १७.१९% कमी दराने | २,६९,१३,२५०/- |
| ६. | रस्ते बांधणे, मुंबई-२ | मे.गुरुदत्त कन्स्ट्रक्शन | १४.७७% कमी दराने | २,७६,९९,७५०/- |
| ७. | मानखुर्द येथील पूलाचे बांधकाम | मे.मंजलांकल कन्स्ट्रक्शन | ७.००% जास्त दराने | ८०,२५,०००/- |

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सभेच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय निविदेनुसार आवश्यक असणा-या कागदपत्रांची पूर्तता करणे आदींसाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१५ :** **मुंबई पायाभूत सुविधा अंतर्गत प्रकल्पग्रस्तांकरीता बांधण्यात येणा-या कायमस्वरुपी निवासी गाळयांचे बांधकाम - बाहय पायाभूत सुविधांच्या अंदाजित खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**१५.१** मुख्य अभियंता यांनी बाब टिप्पणीचा तपशिल सादर करताना असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये एकूण ३५००० कुटुंबे विस्थापित होणार असून त्यांच्या पुनर्वसनासाठी हस्तांतरणीय विकास हक्कापोटी ११ ठिकाणी पक्क्या सदनिकांची बांधकामे प्रगतीपथावर आहेत. या सर्व ठिकाणी बाहय पायाभूत सुविधा जसे की, रस्ते, पाणी पुरवठा, मलनिःसारण इत्यादी निर्माण करणे आवश्यक आहे. यावरील खर्च विकासकांकडून प्राप्त होणा-या सुमारे ७९.५२ कोटी रुपयांच्या ठेवीतून करावयाचा आहे. सदर बाब टिप्पणी प्रशासकीय मंजूरीसाठी सादर केली असून यावरील अंदाजित खर्च रु.४८.७८ कोटी आहे. प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाल्यावर सविस्तर अंदाजपत्रके तयार करुन सार्वजनिकरित्या निविदा मागवून ठेकेदारी नक्की करण्याचा प्रस्ताव आहे.

**१५.२** सदर बाब टिप्पणीवर चर्चा झाल्यानंतर कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.९०० :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोट कलम (३)(iii) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा उदा. रस्ते बांधणे, पाणीपुरवठा, मलनिःसारण इ. आवश्यक बाबी पुरविण्यासाठी प्राधिकरणास प्रशासकीय मान्यता देत आहे. सदरहू योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी येणारा खर्च उप-विकासकांकडून झोपडपट्टी पुनर्विकास नियमाप्रमाणे उपलब्ध होणा-या निधीतून करण्यात यावा. प्राधिकरणाने हयाकरीता आपल्या निधीतून खर्च करु नये.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोटकलम (३)(ii) व पोटकलम (५) नुसार मुंबई पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या अंतर्गत पुनर्वसन प्रकल्पांना लागणा-या पायाभूत सुविधांची कामे प्रचलित नियमानुसार हाती घेण्यास व त्यावर वेळोवेळी होणा-या खर्चाला मान्यता देण्यासाठी महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.१६ :** **मुंबई नागरी परिवहन प्रकल्प / मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्तांसाठी बांधण्यात येणा-या कायमस्वरुपी निवासी गाळयांसाठी पाण्याच्या सहाय्यक शोषण टाक्यांचे बांधकामाच्या लघुत्तम निविदांना मंजूरी मिळणेबाबत.**

**१६.१** मुख्य अभियंता यांनी बाब टिप्पणीची संक्षित माहिती दिली. त्यांनी पुढे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत विस्थापित होणा-या कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी पक्क्या सदनिकांच्या बांधकामाचा ३ ठिकाणी शोषण टाक्या (Auxiliary tank) बांधावयाच्या आहेत. त्यासाठी दिनांक २२ नोव्हेंबर, २००३ रोजीच्या दैनिक वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. प्राप्त झालेल्या निविदा या अंदाजित दरापेक्षा जास्त असल्यामुळे वर्तमानपत्रात दिनांक १२ जानेवारी, २००४ रोजी पुन्हा जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. ३ निविदाकारांनी निविदा सदर कामासाठी सादर केल्या आहेत. दोन वेळा जाहिरात देऊनही निविदेतील दर हा अंदाजित दरापेक्षा जास्त आला. मागविण्यात आलेल्या निविदेमधील मे.विचारे अँड कंपनी यांची निविदा रु.१,४१,८२,५००/- ही १३.४६% जास्त दराने प्रथम लघुत्तम आहे. त्यांच्याशी वाटाघाटी केल्यानंतर निविदेतील अंदाजित दरापेक्षा १३% जास्त दराने (रु.१,४१,२५,०००/-) त्यांनी काम करण्यास संमती दर्शविली आहे. त्यामुळे सदर काम त्यांना प्रस्तावित करण्यात आले आहे.

**१६.२** सदर बाब टिप्पणीवर चर्चा झाल्यानंतर कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.९०१ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोट कलम (३)(iii) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाची

अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांपैकी पाण्याच्या सहाय्यक शोषण टाक्या बांधकामाच्या कामासाठी मे.विचारे अँड कंपनी यांची लघुत्तम निविदा १३% जास्त दराने (रु.१,४१,२५,०००/-) स्विकारण्यास करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह मंजूरी देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सभेच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय निविदेनुसार आवश्यक असणा-या कागदपत्रांची पूर्तता करणे आदींसाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१७ :** **कोले कल्याण, विद्यानगरी, सांताक्रुझ येथील राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राच्या विस्ताराकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या नेमणूकीस मंजूरी मिळण्याबाबत.**

**१७.१** मुख्य अभियंता यांनी बाब टिप्पणीची माहिती देताना असे सांगितले की, नगर विकास विभागाच्या कालिना येथील भूखंडावर एक अग्निशमन प्रशिक्षण केंद्र बांधावयाचे असून या प्राधिकरणाने हे बांधकाम ठेव तत्वावर करावयाचे आहे. बांधकामाचे नकाशे, अंदाजपत्रके बनविणे तसेच प्रकल्पाचे पर्यवेक्षण करणे यासाठी सल्लागारांची निवड करणे आवश्यक होते. यास अनुसरुन दिनांक २.१२.२००३ रोजी सूचना वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली व त्याप्रमाणे एकूण ११ प्रस्ताव प्राप्त झाले. प्राप्त प्रस्तावांची निविदेतील अटींचे अनुपालन होते अगर कसे याची पडताळणी करण्यात आली व ३ प्रस्ताव संवादी ठरविण्यात आले. त्यापैकी मेसर्स फिरोज कुडीयनवाला यांचा द्वितीय लघुत्तम प्रस्ताव वाटाघाटीनंतर प्रथम लघुत्तम निविदाकारांच्या बरोबरीत आणण्यात आला असून त्यास मान्यता देण्याची विनंती आहे.

**१७.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला:-

**ठराव क्र.९०२ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोटकलम (३) (iii) व पोटकलम (५) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती मे.फिरोज कुडीयानवाला

यांना कोले-कल्याण, विद्यानगरी येथील "अग्निशमन प्रशिक्षण केंद्राच्या विस्तारासाठी" प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमण्यास मान्यता देत आहे व त्यांची फी कामाच्या रकमेच्या (काम पूर्ण होण्याच्या वेळी असलेली रक्कम) २.६०५% इतकी असून फी वर ८% सेवाकर असा असून एकूण रक्कम रु.२८,१३,४००/- इतकी आहे. तसेच करारनाम्यातील अटींनुसार देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह या प्रस्तावास मंजूरी देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सल्लागाराच्या नेमणूकीसंबंधी पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१८ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाचा तांत्रिकी-आर्थिक सुसाध्यता अभ्यास - बृहत योजना जाळयासंबंधी सल्लागारांना अतिरिक्त देयकाचे प्रदान करणेबाबत.**

१८.१ प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम कार्यकारी समितीच्या मान्यतेने मे.कन्सलटींग इंजिनिअरिंग सर्व्हीसेस (मे.सी.इ.एस.) या सल्लागाराला दिले होते. त्यासाठी मे.सी.इ.एस. या सल्लागाराला रु.३८.४६ लाख + सेवाकर इतकी फी अदा करण्यात येणार होती. सदर उपनगरातील मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या रस्त्यांच्या कामांची लांबी सुमारे १५० कि.मी. इतकी होती. त्यानंतर मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत मुंबई बेटामधील काही रस्ते घेण्याचे ठरले होते. त्याचा प्रकल्प अहवाल तयार करण्याचे कामही मे.सी.इ.एस. या सल्लागारास देण्यात आले होते. मुंबई बेटातील रस्त्यांची कामे ही सुमारे ८० कि.मी. इतक्या लांबीची होती. सल्लागार नेमणूक / निवडीसाठी स्थापन केलेल्या वाटाघाटी समितीने मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या सदर कामाच्या मोबदल्यात मे.सी.इ.एस. सल्लागारांस प्रमाणात (Proportionately) फी द्यावी अशी शिफारस केली आहे. सदर कामासाठी देय होणारी सल्लागारांची फी रु.१२,००,०००/- (सेवा आकारासह) मंजूर करण्यासाठी शिफारस बाब टिप्पणीमध्ये करण्यात आली आहे त्यास मान्यता मिळावी.

१८.२ सदर प्रस्तावावर चर्चा केल्यानंतर कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.९०३ :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोट कलम (३)(ii) व (iii) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती, मे.कन्सलटींग इंजिनिअरिंग सर्व्हीसेस (मे.सी.इ.एस.) यांना मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या बृहत योजनेसाठी करण्यात आलेल्या अतिरिक्त कामासाठी रु.१२,००,०००/- (सेवा आकारासह) अतिरिक्त रक्कम फी म्हणून देण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१९ :** **मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग हे पद भरण्यासाठी छाननी / निवड समितीची नियुक्ती करण्याबाबत.(गोपनीय)**

प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने प्राधिकरणातील प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग व प्रमुख, नियोजन विभाग या पदासाठी छाननी / निवड समितीचे गठण करण्याचे अधिकार मुख्य सचिव व महानगर आयुक्त यांना प्रदान केले.

त्यानंतर, मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

**जोडपत्र - १ व २**

——— ०००००००००० ———

Annexure I

**Name of Work:Proof checking Consultancy for Bridges/ ROBs/ Elevated roads/ Subway etc. under MUIP**

**Negotiated FINANCIAL OFFERS**

| Standard Fees : Percentage for works costing (Rs crore) | | | | |
|---|---|---|---|---|
| less than 5 | 5 to 10 | 10 to 20 | 20 to 50 | above 50 |
| 0.50 | 0.45 | 0.40 | 0.35 | 0.28 |

| Sr. No. | Name of Consultant | Fees:Percentage for works costing (RS crore) | | | | | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | less than 5 | 5 to 10 | 10 to 20 | 20 to 50 | above 50 | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | Artefact | 0.50 | 0.45 | 0.40 | 0.35 | 0.28 | Exclusive of service tax. |
| 2 | Bridge & Strctural Engineers | | | | 0.25* | 0.23* | Exclusive of service taxes (8%) *original offer |
| 3 | Construma Consultancy | 0.50 | 0.45 | 0.40 | 0.35 | 0.28 | Exclusive of service taxes (8%) |
| 4 | Consulting Engineering Services (India) Pvt. Ltd. | 0.50 | 0.45 | 0.40 | 0.35 | 0.28 | Exclusive of service taxes (8%) |
| 5 | D.D. Desai Associated Engg. Consultant & Analysis Pvt.Ltd. | 0.4# | 0.35# | 0.3# | 0.25# | 0.2# | Exclusive of service taxes (8%) #original offer |
| 6 | Dalal Motts Mac Donald | 0.50 | 0.45 | 0.40 | 0.35 | 0.28 | Exclusive of service taxes (8%) |
| 7 | Frichman prabhu (India) Pvt. Ltd. | 0.50 | 0.45 | 0.40 | 0.35 | 0.28 | Exclusive of service taxes (5.5%) . |
| 8 | Gilcon Project Sergices Ltd. | 0.5# | 0.43# | 0.27# | 0.18# | 0.15# | Exclusive of service taxes (8%) ,# original offer |
| 9 | Inter Continental Consultants Technocreates Pvt. Ltd. | 0.50 | 0.45 | 0.40 | 0.35 | 0.28 | Exclusive of service taxes (8%) |
| 10 | L&T Rambol Consulting Engineer Ltd. | 0.50 | 0.45 | 0.40 | 0.3* | 0.25* | Exclusive of service taxes (8%) *original offer |
| 11 | M.S. Phiske | 0.5# | 0.45# | 0.4# | 0.35# | 0.25# | Exclusive of service taxes (8%) # origional offer |
| 12 | Mukesh & Associate & Consultant Pvt. Ltd. | 0.50 | 0.45 | 0.40 | 0.35 | 0.28 | Exclusive of service taxes (8%) |
| 13 | S.N. Bhobe & Associates | 0.50 | 0.45 | 0.40 | 0.35 | 0.28 | Exclusive of service taxes (8%) |
| 14 | Shirish Patel & Associates | 0.50 | 0.45 | 0.40 | 0.35 | 0.28 | Exclusive of service taxes |
| 15 | Shrikhande Conultants Pvt. Ltd. | 0.50 | 0.45 | 0.40 | 0.35 | 0.28 | Exclusive of service taxes (8%) |
| 16 | Sir Owen Williams Innovestment Ltd. | 0.3# | 0.2# | 0.17# | 0.14# | 0.12# | Exclusive of local taxes RS.Nill, # original offer |
| 17 | SPAN Consultants | | | 0.40 | 0.35 | 0.28 | Exclusive of service taxes (8%) |
| 18 | STUP Consultants. | 0.50 | 0.45 | 0.40 | 0.35 | 0.28 | Exclusive of service taxes (8%) |
| 19 | TCE Consulting Engineer Ltd. | 0.50 | 0.45 | 0.40 | 0.35 | 0.28 | Exclusive of service taxes (8%) |
| 20 | Technogem Consulting Engineer Pvt. Ltd. | 0.50 | 0.45 | 0.40 | 0.32* | 0.26* | Exclusive of service taxes (8%) *original offer |

जोडपत्र-2

Annexure II

**Name of Work:Financial offers for the work of proof checking and supervision Consultancy for R&R works**

**Negotiated offers**

| Sr. No. | Name of Consultant | Negotiated % offer given by consultant for works (project cost @ Rs1.4 lakh per tenement) | Rebate offered for not providing car | Remarks |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | Mahimtura Consultants Pvt. Ltd. | 0.5 | 15000/- per month | Exclusive of 8% service tax |
| 2 | Technogem Consultants Pvt. Ltd. | 0.5 | 15000/- per month | Exclusive of 8% service tax |
| 3 | Kirlosakar Consultant Ltd. | 0.5 | 23000/- per month | Exclusive of 8% service tax |
| 4 | Dhar Galkar Technoesis (India) Pvt. Ltd. | 0.5 | 23000/- per month | Exclusive of 8% service tax |
| 5 | Structwell Designer's Consultants Pvt. Ltd. | 0.5 | rebate not offered but minimum Rs 15000/- rebate will be taken | Exclusive of 8% service tax |
| 6 | Master & Associates | 0.5 | 23000/- per month | Exclusive of 5.5 % service tax |
| 7 | Artefact Projects | 0.5 | 23000/- per month | Exclusive of 8% service tax |
| 8 | Shrikhande Consultants Pvt. Ltd. | 0.5 | 20000/- per month | Exclusive of 8% service tax |
| 9 | Dalal Mott | 0.5 | 23000/- per month | Exclusive of 8% service tax |
| 10 | Consulting Engineering Services | 0.5 | rebate not offered but minimum Rs 15000/- rebate will be taken | Exclusive of 8% service tax |